MAH/MUL/03051/2012
ISSN-2319 9318

International Multilingual Research Journal

# VIDYAWARTA®

Issue-18, Vol-05, April to June 2017

**Dr. Anil Chidrawar**
**I/C Principal**
A.V. Education Society's
Degloor College, Degloor Dist.Nanded

Editor
Dr.Bapu G. Gholap

www.vidyawarta.com

ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE, DEGLOOR Dist. Nanded

MAH/MUL/ 03051/2012 ISSN :2319 9318

# Vidyawarta™

## International Multilingual Research Journal

Apr. To June 2017
Issue-18, Vol-05

Editor
Dr. Bapu g. Gholap
(M.A.Mar.& Pol.Sci.,B.Ed.Ph.D.NET.)

विद्येविना मति गेली, मतीविना नीति गेली
नीतिविना गति गेली, गतिविना वित्त गेले
वित्तविना शूद्र खचले, इतके अनर्थ एका अविद्येने केले

-महात्मा ज्योतीराव फुले

❖ विद्यावार्ता या आंतरविद्याशाखीय बहूभाषिक त्रैमासिकात व्यक्त झालेल्या मतांशी मालक, प्रकाशक, मुद्रक, संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायक्षेत्र:बीड

"Printed by: Harshwardhan Publication Pvt.Ltd. Published by Ghodke Archana Rajendra & Printed & published at Harshwardhan Publication Pvt.Ltd.,At.Post. Limbaganesh Dist,Beed -431122 (Maharashtra) and Editor Dr. Gholap Bapu Ganpat.

Reg.No.U74120 MH2013 PTC 251205

Harshwardhan Publication Pvt.Ltd.
At.Post.Limbaganesh,Tq.Dist.Beed
Pin-431126 (Maharashtra) Cell:07588057695,09850203295
harshwardhanpubli@gmail.com, vidyawarta@gmail.com
All Types Educational & Reference Book Publisher & Distributors / www.vidyawarta.com

ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE, DEGLOOR Dist. Nanded

16) LIBRARY SCIENCE EDUCATION WITH ICT APPLICATION IN MADHYA PRADESH: AN....
Dr Jitendra Kumar, Agra (U.P) || 77

17) The Importance of National Social Assistance Programme in Indian Welfare Economy
Mr. Suresh N. Hoogar-Dr. Basavaraj H. Nagoor, Dharwad. || 84

18) शांता शेळके यांची भाषाशैली
डॉ. सरकटे सदाशिव, शिवाजीनगर, गढी. || 90

19) मराठी मुस्लीम वैचारिक साहित्याचे आशयविश्व
शेख म. रफी म. युसूफ, पुणे || 94

20) २१ व्या शतकातील आव्हाने व कादंबरी
प्रा. डॉ. अत्तार अमजद हारूण, शिराढोण. ||99

21) स्वतंत्र विदर्भ राज्य आंदोलनाची सद्य:स्थिती
माधव चोले , देगलूर || 101

22) ग्रामीण कारागिर विकासासाठी बलुतेदार बहुउद्देशिय सहकारी ग्रामोद्योग संस्थांची गरज
प्रा. प्रकाश मांगीलाल राठोड, चाळीसगांव, जि. जळगांव. || 105

23) मुलं आणि मुलींमध्ये असणाऱ्या मुल्यांचा तुलनात्मक अभ्यास
डॉ. दीपा बलखंडे, महाल, नागपूर || 107

24) आरोग्य विषयी काही नियम
प्रा.डॉ चाऊस एस ए.—प्रा. श्री. साखरे डी एल || 112

25) संगीत के परवेस में भजन संप्रदाय कि विभिन्नता "वारकरी संप्रदाय"
प्रा. किशोर देशमुख, अकोला || 114

26) मराठी साहित्यातील बदलते प्रवाह - एक जीवन
मार्गदर्शक : डॉ. अरुण कोळी, संशोधक : प्रा. देविदास शिंदे || 118

27) जात:डॉ.आंबेडकरांच्या दृष्टीकोणाचे विश्लेषणात्मक अध्ययन
प्रा. पोटभरे एस.डी., पाचोड, ता.पैठण, जि. औरंगाबाद || 121

28) खेड तालुक्यातील बालक स्त्रि पुरूष प्रमाणाचा चिकित्सक अभ्यास
प्रा. दिलीप ज्ञानेश्वर मुळूक, राजगुरूनगर, ता. खेड, जि. पुणे. || 124

29) पद्मभूषण डॉ. ना.सु. हर्डीकर यांच्या विचारांची प्रासंगिकता
प्रा. डॉ. ज्योति राखुंडे, भद्रावती. || 129

30) बीड जिल्ह्यातील नगरपालिकांचा राजकीय अभ्यास
प्रशांत भाऊसाहेब सोळंके, नांदेड. || 132

https://sites.google.com/site/vidyawartajournal | http://www.vidyawarta.blogspot.com

MAH MUL/03051/2012
ISSN: 2319 9318 | Vidyawarta® | April To June 2017
Issue-18, Vol-05 | 08

ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE, DEGLOOR Dist. Nanded

31) जैन संस्कृतीतील स्त्री प्रतिमेचे ऐतिहासिक विश्लेषण
प्रा. डॉ. कविता राजेंद्र तातेड, यवतमाळ (महा.) || 135

32) भारतीय लोकशाहीतील धर्मनिरपेक्षता
प्रा. एस.पी.उमरीवाड, ऐनपूर, ता.रावेर जि.जळगाव || 140

33) जयवंत दळवी यांच्या कादंबरी, कथा व नाटकातील दिव्यांगाचे चित्रण
डॉ. के. एन. सोनवणे, चोपडा. || 143

34) भारतीय वाड्मय में ऊर्जा की अवधारणा
डॉ० वैशाली जैन, हापुड, उत्तरप्रदेश || 145

35) विशिष्ट विद्यालय के शिक्षकों का सूचना एवं सम्प्रेषण तकनीकी के प्रयोग के सन्दर्भ में..
अम्बालिका सिंह–डॉ. किरन लता डंगवाल, लखनऊ || 152

36) जैन दर्शन में ऊर्जा का स्वरूप...
डॉ० वैशाली जैन, दिल्ली || 158

37) अपने–अपने पिंजरे:दलित–मुस्लिम संबंधों के परिप्रेक्ष्य में
डॉ. मिथुन कुमार, दिल्ली || 164

38) उत्तराखण्ड की जलवायु का एक अध्ययन
डॉ० राकेश चन्द्र पाण्डेय, रुड़की || 171

39) चरमोत्कर्पकालीन स्वाधीनता आन्दोलन के युग में छत्तीसगढ़ की रियासतों के प्रजामण्डल आन्दोलन....
डॉ. चेतन राम पटेल–श्री शरद सिंह ठाकुर, छत्तीसगढ़ || 175

40) अल्का सरावगी के कहानियों में नारी चित्रण
प्रा. डॉ. जायदा सिकंदर शेख, तीर्थपुरी, ता.घनसावंगी, जि.जालना || 179

41) लघु ऋण द्वारा स्व सहायता समूहों का आर्थिक विकास का अध्ययन
ड़ॉ. कमल जैन–डॉ. महेश गुप्ता–संतोष कटारे–गंगाराम कटारे || 185

42) वर्तमान समय मे संगीत की दशा–एक अवलोकन
डॉ. वंदना देवी, बारू साहिब, हिमाचल प्रदेश || 188

43) उत्तर प्रदेश के विश्वविद्यालयों ग्रन्थालयों की कार्मिक प्रणाली, श्रेणी एवं उनका सामाजिक स्तर
डा० योगेश शर्मा, आगरा, उ० प्रदेश || 190

https://sites.google.com/site/vidyawartajournal | http://www.vidyawarta.blogspot.com

MAH MUL/03051/2012
ISSN: 2319 9318

Vidyawarta®

April To June 2017
Issue-18, Vol-05

021



# स्वतंत्र विदर्भ राज्य आंदोलनाची सद्यःस्थिती

माधव चोले
सहाय्यक प्राध्यापक, राज्यशास्त्र विभाग
देगलूर महाविद्यालय, देगलूर

**********

विदर्भ हा एक नैसर्गिक साधन संपत्तीने विपुल प्रदेश आहे. ऐतिहासिक, सांस्कृतिक वेगळेपणा आणि मागासलेपणाच्या कारणांनी गेल्या एक शतकापासून अधिक काळ लोकशाही पध्दतीने व अहिंसात्मक मार्गाने आंदोलन चालू आहे. परंतु स्वातंत्र्यपूर्व काळात नंतर व्दैभाषिक राज्यात आणि संयुक्त महाराष्ट्राच्याा सत्ताकारणात विदर्भ राज्याचा सतत बळी गेलेला आहे. याला स्वतंत्र राज्याचे ठोस भूमिका असणारे नेतृत्व नाही (अपवाद बापूजी आणे आणि जांबुवंतराव धोटे) राजकीय पक्षांच्या तेव्हाच्या सत्ता समीकरणात आणि आता आघाडयांच्या सत्ता समीकरणात दुटप्पी भुमिका तसेच विदर्भांतूनच स्वतंत्र राज्याला विरोध करणारे नेते, अभ्यासक, साहित्यिक आणि स्वतंत्र राज्य चळवळीला असलेला लोकांचा मर्यादित पाठिंबा यामुळे हा प्रश्न सतत दुर्लक्षित राहिलेला आहे या सर्व बाबींचा अभ्यास पुढील प्रमाणे आहे.

नागपूर प्रांत पूर्वी गोंड राजांचा नंतर भोसल्यांचा झाला. १८०३ मध्ये भोसले ब्रिटिशांचे मांडलिक बनले १६.१२.१९०२ रोजी निजामाने ब्रिटिशासोबतच्या कराराने वऱ्हाडचा प्रांत कायमचा २५ लाख भाडे पट्टीवर ब्रिटिशांना देऊन टाकले, ब्रिटिशांनी स्वतःच्या सोईसाठी १९०५ ला, वऱ्हाड,नागपूर प्रांताचे आठ जिल्हे आणि मध्यप्रांत छत्तीसगडचे तत्कालीन १४ हिंदी भाषिक जिल्हे मिळून मध्यप्रांत तयार केला.

**मराठी भाषिकांची मध्यप्रांतातून विदर्भाची मागणी :**

वऱ्हाड,ब्रिटिशांनी मध्य प्रांताला जोडल्यानंतर दादासाहेब खापर्डे यांनी मराठी भाषिक वऱ्हाड मध्यप्रांतात समाविष्ट न करता तो मराठी भाषिक मुंबईला जोडवा यासाठी सभा, बेठका, घेऊन आंदोलन केले. तसेच बापुजी अणेंच्या नेतृत्वाखाली वऱ्हाड सर्वपक्षीय समिती स्थापन करुन त्यांनीही मध्यप्रांतातून वेगळे करण्यासाठी आंदोलन केले, मध्यप्रांतातील हिंदी भाषिकांचे वर्चस्व व प्रभाव यातून मुक्त होण्याच्या आकांक्षेने मध्यप्रांतातून वेगळे निघण्याची भावनेचा उदय झाला. त्यातच हिंदी भाषिकांनी बहुमताच्या जोरावर मराठी मुख्यमंत्री नाकारला, सुरुवातीला मध्यप्रांतातून मराठी भाषिक वेगळे निघण्याची भावना स्वतंत्र राज्यात झाली. बॅ.रामराव देशमुखांनी १ ऑक्टोबर १९३८ रोजी मध्यप्रांत विधानसभेत मराठी भाषिकांचा प्रदेश 'विदर्भ प्रदेश' या नावाने स्वतंत्र करण्यात यावा असा ठराव सर्वानुमते मंजूर झाला. पण दुसऱ्या महायुध्दामुळे हा प्रश्न येथेच राहिला.

**संयुक्त महाराष्ट्र चळवळ आणि विदर्भ :-**

पुढे बॅ.रामराव देशमुखांच्या अध्यक्षतेखाली 'महाविदर्भ सभा' १८ ऑगस्ट १९४० रोजी स्थापन करुन मध्यप्रांतातून 'नागाविदर्भ' किंवा महाविदर्भ राज्य करावे यासाठी बापुजी आणे, ब्रिजलाल बियाणी, जमानलाल बजाज, राजे विश्वेश्वरया टी.जी.देशमुख, बाबुराव हरकरे, जनरल आवारीया काँग्रेस नेत्यांनी विदर्भाचे आंदोलन मोठ्या प्रमाणात चालविले. मात्र दरम्यानच्या काळात स्वातंत्र्याचे आंदोलन, त्या बाबतच्या वाटाघाटी, दुसरे महायुध्द, यामुळे काँग्रेस नेते व्यस्त होतेः पुढे एका बाजूने स्वतंत्र विदर्भाचे आंदोलन तर दुसऱ्या बाजुने विदर्भातीलच ग.त्र्य. माडखोलकरांनी १९४६ च्या बेळगांवच्या साहित्य संमेलनात विदर्भासह मराठी भाषिकांचे स्वतंत्र राज्य व्हावे यासाठी ठराव मांडला. त्यासाठी १९४६ साली संमपची स्थापन करण्यात आली. त्याला महाराष्ट्रातील सर्वच पक्षांनी पाठिंबा दिला (काँग्रेस, जनसंघ वगळता) आणि संयुक्त महाराष्ट्राचे आंदोलन सुरु झाले. याला विदर्भातील पी.के.देखमुख, वीर वामणराव जोशी व ग.त्र्य. माडखोलकरांनी पाठिंबा देऊन चळवळीत सहभाग घेतला होता. त्यामुळेच सुरुवातीला स्वंतत्र विदर्भ राज्य आंदोलनाबाबत विदर्भात काँग्रेस नेत्यांत मतभेद पुढे आलेले होते, मात्र बापुजी आणे, बियानी, कन्नमवार, जांबुवंतराव धोटे यांनी स्वतंत्र विदर्भाची मागणी करुन आंदोलन सुरु ठेवले होते. ८ ऑगस्ट १९४७ रोजी संमप आणि नागविदर्भ समिती मध्ये अकोला करार झाला या कराराकडे विदर्भवादी मध्यप्रांतातून विभक्त होण्याच्या दृष्टीने पाहत होते. तर महाराष्ट्रवादी सर्व मराठी भाषिकांचे एक राज्य होईल म्हणून पाहत होते. त्यामुळे या करारातील अटी वेगळ्या विदर्भाच्या भावना कायम ठेवून एक राज्य निर्माण करणाऱ्या होत्या. या करारावर १७ पुढाऱ्यांच्या सह्या झालेल्या होत्या. बॅ.रामराव देशमुख हे बापूजी आणे सोबत स्वतंत्र विदर्भाच्या आंदोलनातील सक्रिय नेते होते. पण त्यांनी मुंबईतील संमपच्या अध्यक्षीय भाषणात विदर्भासह मराठी एक भाषिक राज्य झाले तर ते आम्हाला आवडेलअसे म्हटले. त्यामुळे स्वतंत्र विदर्भ राज्याची बाजू सुरुवातीपासून लंगडी होत गेलेली आहे असेच प्रकार पुढील काळातही घडलेले दिसतात.



ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE, DEGLOOR Dist. Nanded

ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE, DEGLOOR

भाषिक राज्यरचनेसाठी नियुक्त केलेल्या दारा कमिशनने स्वतंत्र विदर्भ राज्य करावे आणि पश्चिम महाराष्ट्र व मुंबईसह एक मराठी भाषिक राज्य करावे अशी शिफारस केली पण कॉंग्रेस श्रेष्ठी मुंबईसह मराठी भाषिक राज्याला अनुकूल नव्हते. जवप समितीने (५ एप्रिल १९४९) स्वतंत्र विदर्भ राज्याच्या मागणीचे समर्थन केले होते पण तुर्तास देशा समोरच्या समस्या पाहता भाषिक राज्यरचनेचा प्रश्न पुढे ढकलावा आणि देशा समोरच्या प्रश्नांना प्राधान्य दयावे, अशी शिफारस केली होती. विदर्भातील कॉंग्रेस नेत्यांमध्ये संयुक्त महाराष्ट्रात सामील होण्याबाबत, दोन गट होते. एक पुर्व विदर्भातील,ब्राम्हण, आदिवाशी आणि अमराठी नेत्यांचा कल स्वतंत्र राज्याकडे होता तर प.विदर्भातील मराठा कुणबी नेत्यांचा कल संयुक्त महाराष्ट्राकडे होते. या मतभिन्नतेमुळे स्वतंत्र विदर्भ राज्य चळवळीवर मर्यादा पडल्या होत्या.

**नागपूर करार (सप्टेबर १९५३) :**

यशवंतराव चव्हाणांच्या पुढाकाराने, विदर्भाला संयुक्त महाराष्ट्रात समाविष्ट करण्याच्या उद्देशाने प.महाराष्ट्रातील कॉंग्रेसचे नेत्यांनी (संमप) आणि विदर्भातील नेत्यांमध्ये २७, २८ सप्टेंबर १९५३ रोजी एक खाजगी करार झाला त्यालाच नागपूर करार म्हणतात. या कराराव्दारे, विदर्भाला लोकसंख्येच्या प्रमाणात शिक्षण, नोकऱ्या, मंत्रीमंडळात तसेच इतर विकासक्षेत्रात सेवा सुविधा आणि निधी उपलब्ध करुन देण्याचे नागपूरला उपराजधानी, न्यायालयाचे खंडपीठ देण्याचे आश्वासन देण्यात आले. आणि विदर्भाला संयुक्त महाराष्ट्रात सामील केले गेले. करारानंतर विदर्भातील लोकांना विश्वास वाटावा म्हणून संविधानात संशोधन करुन ३७१ (२) कलम नवे टाकून विदर्भाच्या विकासासाठी वैधानिक मंडळ स्थापन करण्याची तरतूद करण्यात आली.

**राज्यपुनर्रचना आयोग आणि विदर्भ :**

राज्यपुनर्रचना आयोगाकडे अणेंनी विदर्भ राज्याच्या पुष्टीसाठी ''विदर्भाची केफियत'' मांडली होती. आयोगाने आपला अहवाल १० आक्टोबर १९५५ रोजी प्रकाशित केला. आयोगाने मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राची मागणी डावलून विशाल व्दैभाषिक राज्याची शिफारस केली तसेच स्वतंत्र विदर्भाच्या मागणीला ऐतिहासिक, सांस्कृतिक, प्रशासकीय आणि वित्तीय पार्श्वभूमीचा आधार असल्याने विदर्भ वऱ्हाडच्या आठ जिल्ह्यांचे मिळून स्वतंत्र महाविदर्भ राज्य करावे अशी शिफारस केली. याला डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी पुष्टी देत पूर्व महाराष्ट्र (विदर्भ) पुर्वीचे वेगळे राज्य असून त्याचे वेगळे राज्य राहू दयावे कारण विदर्भाची एक सुव्यवस्थित प्रशासन राजस्व व न्याय व्यवस्था आहे. त्याच बरोबर आंबेडकरांनी महाराष्ट्राचे एकुण चार राज्य करण्याचे सुचित केलेले होते. व्दैभाषिक राज्याचा निर्णय गुजरात आणि महाराष्ट्रवाद्यांनाही आवडला नाही. मुंबई कोणाची यावरुन वाद तीव्र झाला होता. विदर्भ वगळता उर्वरित महाराष्ट्रात कॉंग्रेसचा प्रभाव कमी झालेला होता. कॉंग्रेसला व्दैभाषिक राज्यात सत्ता स्थापन करायचे असेल तर कॉंग्रेसचे बहुमत असणाऱ्या विदर्भाला व्दैभाषिक राज्यात जोडल्याशिवाय त्यांची सत्ता येणार नव्हती. म्हणून कॉंग्रेसच्या केंद्र सरकारने विदर्भवादयांची इच्छा नसतांना सुध्दा १ नोव्हेंबर १९५६ रोजी विदर्भाचा समावेश व्दैभाषिक राज्यात केला. अशा प्रकारे विदर्भ राज्याच्या चळवळीला कॉंग्रेसच्या पक्षीय राजकारणाने खीळ बसली.

**यशंवतरावाचे एकमुखी नेतृत्व :**

१९५७ च्या निवडणूकीत विदर्भात नागा-विदर्भ आंदोलन समितीचा पराभव झाला. विदर्भ वगळता उर्वरित महाराष्ट्रात आणि गुजरातमध्ये कॉंग्रेसचा दारुण पराभव झाला होता. विदर्भात कॉंग्रेसच्या ६२ पैकी ५४ जागा निवडून आल्या होत्या. ५४ आमदारांनी स्वतंत्र विदर्भासाठी कन्नमवारांकडे राजीनामे दिले होते व्दैभाषिक राज्यात विदर्भाचा पाठिंबा मिळाला तरच यशंवतरावांच्या नेतृत्वाखाली सरकार स्थिर होणार होते. नेहरुंनी कन्नमवारांची समजूत घातल्याने कॉंग्रेसच्या निष्ठेपायी कन्नमवारांनी आपल्या आमदारांचा पाठिंबा दिला. आणि तत्कालीन कॉंग्रेसचे सरकार स्थिर झाले. एका बाजूने संमपचे तीव्र आंदोलन तर दुसऱ्या बाजूने नागाविदर्भ समितीचे आंदोलन स्वतंत्र विदर्भासाठी तीव्र झाले होते (टि.जी.देशमुख व जांबुवंतराव धोटे) या पार्श्वभूमीवर १४ मार्च १९६० रोजी विधिमंडळात राज्यविभाजनाचा ठराव मांडण्यात आला. यावेळी यशवंतरावांनी ''स्टेटमेंट ऑफ गव्हर्नमेंट पॉलिसी'' या शीर्षकाखाली विदर्भवासियांना लोकसंख्येच्या प्रमाणात भरभरुन आश्वासने देण्यात आली होती. केंद्रीय राजकारणात महाराष्ट्रवादयांच्या दबावापुढे केंद्र सरकारने १ मे १९६० रोजी विदर्भासह महाराष्ट्राची स्थापना करण्यात आली. त्यामुळे विदर्भवादी नाराज होऊन नागाविदर्भ समिती, मार्फत बापुजी आणेआणि महाविदर्भ राज्य संघर्ष समितीतर्फे जांबुवंतराव धोटे यांनी स्वतंत्र विदर्भासाठी आंदोलन छेडले बंद, मोर्चे, धरणे यामुळे हे आंदोलन व्यापक झाले होते. १९६० नंतर यशवंतरावांनी मंत्रीमंडळात विदर्भवादयांना उचित स्थान देवून कॉंग्रेसच्या दावणीला बांधले तसेच नागपूर करारांचे आश्वासन देऊन, महाराष्ट्रात एकहाती राजकारणाची चौकट उभी केली त्यामुळे स्वतंत्र राज्याची चळवळ ओसरली.

**इंदिरागांधींचे गट बाजीचे राजकारण आणि विदर्भाचे आंदोलनः**

१९७०-८५ च्या इंदिराजींच्या काळात इंदिरा गांधीने एकीकडे महाराष्ट्रातील वर्चस्वाखाली नेतृत्वाचे खच्चीकरण केले

ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE, DEGLOOR Dist.Nanded



तर दुसरीकडे विदर्भ, मराठवाडा, आणि कोकण या मागास भागातील कमकुवत नेतृत्व हाताशी धरुन आपली सत्ता शाबुत ठेवण्यासाठी गट-बाजीचे राजकारण केले. यात विदर्भवादी नासिकराव तिरपुडे, वसंतराव साठे आणि जांबुवंतराव धोटे सारखी प्यादी वापरण्यात आली. त्यामुळे विदर्भाचे आंदोलन थंड बसत्यात पडले. धोटेंनी विदर्भ राज्यांचे आंदोलन व्यापक केले होते पण इंदिराजींनी त्यांना नागपूर लोकसभेची जागा बहाल केली आणि धोटे आपल्या फॉरवर्ड ब्लॉक पक्षासह १९७८ मध्ये काँग्रेसमध्ये विलीन झाले.

१९८० नंतरच्या महाराष्ट्राच्या राजकारणात प्रादेशिक विकासाच्या असमतोलाचा मुद्दा, त्यानिमित्ताने वि.वै.वि.मंडळाच्या स्थापनेची मागणी झाली. त्याला सर्वच पक्षांनी पाठिंबा दिला आणि १९९४ ला वि.वै.वि.मंडळाची स्थापना करण्यात आली. १९९५ ला आलेल्या युती शासनाच्या काळात. युतीला अडचणीत आणण्यासाठी काँग्रेसने विदर्भ राज्याचे हत्यार उपसले त्यात वसंत साठे, विलास मुत्तेमवार, रणजित देशमुख, जवाहरलाल दर्डा,रिखबचंद शर्मा आणि सतिश चतुर्वेदी इत्यादी काँग्रेस नेते होते पण आंदोलनात पूर्व विदर्भ आणि पश्चिम विदर्भ अशी गटबाजी झालेली होती.

**रालोआ सरकार आणि विदर्भ राज्यांचा मुद्दा :**

भाजपाने विदर्भ राज्याचे आश्वासन दिलेले होते. केंद्रात रालोआ सरकार आल्यानंतर १ नोव्हेंबर २००० रोजी तीन नवीन राज्यांची निर्मिती केली. त्याबरोबर अडखळत चालणाऱ्या विदर्भ आंदोलनाला जीव आला विदर्भ राज्यासाठी पदयात्रा, बंद, मोर्चे, आंदोलने करण्यात आली. या आंदोलनाला शिवसेना व डाव्यांचा अपवाद वगळता सर्वच पक्षांनी पाठिंबा दिला. मात्र संसदेत विदर्भाचा मुद्दा चर्चेला आल्यानंतर काँग्रेस आणि शिवसेनेने विरोध केलेला होता काँग्रेसचे विरोध करण्याचे कारण उर्वरित महाराष्ट्रातून सत्ता जाण्याची भीती होती. भाजपाला शिवसेनेची आडकाठी होती.

मे २००६ मध्ये सत्यशोधन समितीने (कॅग) राज्यसरकार विदर्भाला सावत्र भावाची वागणूक देत आहे. प.महाराष्ट्राला लाभ होत असतांना विदर्भाचा अनुशेष वाढत आहे आणि विदर्भाचा निधी पळविला जात आहे. असा ठपका ठेवला होता. केंद्र सरकारने तेलंगणाची घोषणा केली नंतर माघार घेतली त्यामुळे तेलंगणात व्यापक आंदोलन झाले त्याची प्रेरणा घेऊन विदर्भासाठी सर्वपक्षीयांनी २० जानेवारी २०१० रोजी विदर्भ बंद पुकारला या बंदला शिवसेना,मनसे आणि डावे वगळता सर्वांनी पाठिंबा दिला. हा पहिलाच विदर्भातील व्यापक बंद होता. तो यशस्वीही झाला. २० मार्च २०१३ रोजीच्या एका कार्यक्रमात जांबुवंतराव धोटे यांनी आता बस झाले स्वतंत्र विदर्भ राज्याचे आंदोलन ''जनता जाओ या मरो'' अशी भावना व्यक्त केली. यावरुन विदर्भ आंदोलनाची स्थिती लक्षात येते.

**विदर्भ राज्याचे आंदोलन (ऑगस्ट २०१३) :**

३१ जुलै २०१३ रोजी तेलंगणाराज्याची घोषणा केल्यानंतर विदर्भातही आंदोलनाचे वातावरण निर्माण झाले. काँग्रेसच्या विलास मुत्तेमवार, नरेश पुंगालिया आणि विजय दर्डा यांनी सोनिया गांधींना स्वतंत्र विदर्भ राज्यासंबंधी पत्रव्यवहार केले. आणि मागणी केली.

VJAC ने ५ ऑगस्ट २०१३ रोजी दिल्ली येथे जंतर-मंतरवर शेकडो कार्यकर्त्यांसह दिवसभर उत्स्फुर्त धरणे धरले. याला बोडोलँड पीपल्स फ्रंटने, आम आदमीने पाठिंबा दिला होता. पण या आंदोलनाकडे महाराष्ट्रातील दोन्ही बड्या पक्षातील दिल्लीतील नेते फिरकले सुध्दा नाहीत. तसेच या आंदोलनात सत्ताधारी आणि विरोधी पक्षातील कोणत्याही आमदारांनी प्रत्यक्ष सहभाग घेतलेला नव्हता. या आंदोलनात VJAC समन्वयक अॅड.वामनराव चटप, आमदार अनिल बोंडे, डॉ.श्रीनिवास खांदेवाले, आशिष देशमुख, विलास काळे, प्रा.कमल भारव्दाज, रामेश्वर मोहबे, शंकर भोळे, तनहा नागपूरी, प्रतिभा खापर्डे यांच्यासह शेकडो कार्यकर्त्यांनी सहभाग घेतला होता. तेलंगणा विधेयकात वेगळ्या विदर्भाच्या दुरुस्तीचा अंतर्भाव करावा म्हणून प्रदेशाध्यक्ष देवेंद्र फडणीस यांच्या शिष्टमंडळाने केंद्रीय वरिष्ठांना भेटून विनंती केली, संसदेत विलास मुत्तेमवारांनी महाराष्ट्राची राजधानी मुंबईहून नागपूरला हलवून गतवैभव प्राप्त करुन दयावे. अशी मागणी केली. VJAC ने २८ सप्टेंबर २०१३ रोजी नागपूर येथे पुर्वनियोजित नागपूर करारांची होळी करण्यात आली. यात अनेक विदर्भ समर्थक कार्यकर्त्यांनी सहभाग घेतला होता. डॉ.अशिष देशमुख यांनी २८ सप्टेंबर २०१३ रोजी विदर्भात ''विदर्भ संघर्ष यात्रा'' काढली होती. या यात्रेत महाविद्यालयातील युवक-युवतींनी भाग घेतला होता. २०१३ मध्येच अमरावती, विदर्भ माझा आणि समाजकार्य महाविद्यालयाने स्वतंत्र विदर्भासाठी जनमत चाचणी घेतली होती. या जनमतचाचणीत ८५% लोकांनी विदर्भाच्या बाजूने तर १२% लोकांनी विरोधात मतदान केलेले होते. नागपूर करारांचे समन्यायी विकासाचे वचन सरकारने पाळले नाही १९५६ ला तरतूद केलेली वि.वे.मंडळ हे १९९४ ला स्थापन झाली. १९९४ पासून आतापर्यंत वि.वै.मंडळाला विदर्भाचा अनुशेष दूर करण्यात यश आलेले नाही. दांडेकर समिती (१९८३) कॅग अहवाल २००६, राज्यपालांचे निर्देश यात स्पष्ट होते की विदर्भाचा म्हणवा तसा विकास झाला नाही.

विदर्भ राज्यांचे आंदोलन व्यापक का झाले नाही? आंदोलनाला जनतेचा पाठिंबा का मिळाला नाही? यांचा शोध घेतल्यास आंदोलनाला एक कार्यक्षम नेतृत्व मिळाले नाही. काही काळ बापुजी अणेंचे नेतृत्व मिळाले होते पण नतंरच्या काळात पक्षीय मतभेद

विसरुन ताकदीने दीर्घकाळ लढणारा एकहाती नेतृत्वही मिळाले नाही. ज्या पक्ष आणि संघटनांचा स्वतंत्र विदर्भ राज्याला पाठिंबा मिळाला त्यांची ताकत फारच कमी आहे हे तेवढेच खरे आहे. त्याचप्रमाणे स्वतंत्र विदर्भाचे समर्थन करणारा एकही प्रभावी पक्ष विदर्भात नाही भाजपाने स्वतंत्र विदर्भाचे समर्थन केले, मात्र निवडणूकीत स्वतंत्र विदर्भाचा मुद्दा न घेता इतर मुदयावर भर दिला शिवाय युतीतील शिवसेनेचा स्वतंत्र विदर्भाला स्पष्ट विरोध असल्याने प्रादेशिक राजकारणासाठी भाजपाला नमती भूमिका घ्यावी लागते ''महाविदर्भ राज्य संघर्ष समितीने'' विदर्भातल्या पूर्ण जागा कधीच लढविल्या. नाहीत काही लढविल्या त्या जागावरील उमेदवारांच्या अनामत रकमा जप्त झाल्या आहेत. अपवादाने एक, दोन जागा चंद्रपुरमध्ये मिळाल्या आहेत. विदर्भवादी नेते हे वारंवार दुटप्पी भूमिका घेत आलेले आहेत. प्रभावी ठोस भूमिका एकाही नेत्यांनी घेतलेले नाही. काही नेत्यांनी व्दैभाषिक मुंबई राज्यांची स्थापना झाल्यानंतर संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत भाग घेतला होता. स्वतंत्र विदर्भाच्या मागणीकडे दुर्लक्ष केलेले होते. विदर्भात कॉंग्रेसचा प्रभाव जास्त राहिलेला आहे. काही विदर्भवादयांनी कॉंग्रेसमध्ये राहून सत्तास्थाने प्राप्त करुन, विदर्भाची मागणी केलेली होती. मात्र कॉंग्रेसने स्वतःचे सरकार स्थिर करण्यासाठी व आपला प्रभाव शाबुत राहण्यासाठी वारंवार विदर्भ राज्याचा बळी दिलेला आहे. स्वतंत्र विदर्भाचे आंदोलन करणारे काही नेते आपल्या निवडणूकीत होणाऱ्या सारख्या पराभवाला कंटाळून, आपला राजकीय अंत होईल म्हणून कॉंग्रेसमध्ये प्रवेश करुन मंत्रीपदे प्राप्त केलेली आहेत. अशा दुटप्पी भूमिकेमुळे विदर्भाचे आंदोलन व्यापक होऊ शकले नाही विदर्भ राज्य चळवळीला अपयश हे विदर्भवादयांची दुटप्पी भूमिका, आणि विदर्भातूनच अखंड महाराष्ट्राची मागणी यामुळे आलेले आहे.

संदर्भसुची :-


१. श्रीनिवास खांदेवाले-२०१२, 'विदर्भ राज्य संकल्पना' विसा बुक्स, विनोद लोकरे, नागपूर, पृष्ठ-१६
२. प्रा.द.ना.धनागरे, स्वंतत्र विदर्भ राज्य ध्यास,विचार आणि चळवळ, जुलै २०११, नवभारत सातारा, पृष्ठ -८
३. डॉ.श्रीपाद भालचंद्र जोशी, ४ जाने २०१३, ''वेगळा विदर्भ की अखंड महाराष्ट्र? एका वादाची सद्य:स्थिती'' ग्रंथाली प्रकाशन, मुंबई, पृष्ठ-१४९, १५०, १५१, १५२
४. श्रीनिवास खांदेवाले-२०१२, 'विदर्भ राज्य संकल्पना' विसा बुक्स, विनोद लोकरे, नागपूर, पृष्ठ-१६
५. सुहास कुलकर्णी, मिलिंद चंपानेरकर, २६ फेब्रु.२०१३, असा घडला भारत, विदर्भ प्रश्न व नागपूर करार, रोहन प्रकाशन पुणे पृ.-१९८
६. य.दि.फडके, १८ जुन २००७, विसाव्या शतकातील महाराष्ट्र, खंड सहावा, स.म.चळवळ (१९४८ ते १९६०) मौज प्रकाशन पुणे, पृष्ठ-५४, ६२, ६३
७. य.दि.फडके, १८ जून २००७, विसाव्या शतकातील महाराष्ट्र, खंड सातवा, स.म.चळवळ (१९४८ ते १९५६) मौज प्रकाशन पुणे, पृष्ठ- ६३, ६४
८. तुकाराम जाधव, २००८-०९, महाराष्ट्र वार्षिकी, स्वतंत्र विदर्भ राज्याची चळवळ हेमंत कडूकर, युनिक अॅकडमी पुणे, पृ. ६२,६३
९. श्रीनिवास खांदेवाले-२०१२, 'विदर्भ राज्य संकल्पना' विसा बुक्स, विनोद लोकरे, नागपूर, पृष्ठ-३०, ३१, ३२
१०. अनिल वासनिक, १४ ऑक्टो २०१०, 'विदर्भ राज्य वास्तव आणि विपर्यास' नागपूर, पृष्ठ,८,९
११. श्रीनिवास खांदेवाले-२०१२, 'विदर्भ राज्य संकल्पना' विसा बुक्स, विनोद लोकरे, नागपूर, पृष्ठ-३३
१२. सुरेश व्दादशीवार, १४ ऑगस्ट २०१०, तर विदर्भाने महाराष्ट्रासोबत राहायचे कशाला? साधना पुणे, पृष्ठ-८,९
१३. अॅड.मधुकर किंमतकर, १४ ऑगस्ट २०१०, 'भविष्यातील विकासाकरिता वेगळ्या विदर्भ राज्याशिवाय अन्य पर्याय नाही' 'विदर्भाला सुखी करा' साधना पुणे, पृष्ठ-२२
१४. अनिल वासनिक, १४ ऑक्टो २०१०, 'विदर्भ राज्य वास्तव आणि विपर्यास' नागपूर, पृष्ठ,१६
१५. तुकाराम जाधव, २००८-०९, महाराष्ट्र वार्षिकी, स्वंतत्र विदर्भ राज्याची चळवळ, हेमंत कडूकर, युनिक अॅकडमी पुणे, पृ. ६४
१६. पुर्वोक्त- पृष्ठ- ६५
१७. बबन लाव्हत्रे, ६ डिसेंबर २०१२, विदर्भ राज्याचे खच्चीकरण, प्रबुध्द प्रकाशन नागपूर, पृष्ठ-७०, ७१
१८. हेमंत कडुकर, २००६, विदर्भाचे मागासलेपण: वि.वै.विकास मंडळाची भूमिका, राज्यशास्त्र व लोकप्रशासन विभाग,पुणे विद्यापीठ पुणे, अप्रकाशित (M.Phil) प्रबंध.
१९. हेमंत कडुकर, २००६, विदर्भाचे मागासलेपण: वि.वै.विकास मंडळाची भूमिका, राज्यशास्त्र व लोकप्रशासन विभाग,पुणे विद्यापीठ पुणे, अप्रकाशित (M.Phil) प्रबंध.
२०. बबन लाव्हात्रे, ६ डिसेंबर २०१२, विदर्भ राज्याचे खच्चीकरण प्रबुध्द प्रकाशन नागपूर, पृष्ठ- ४६,४८
२१. दै.लोकमत, देशोन्नती, २१ जानेवारी २०१० नागपूर पृष्ठ-१
२२. लोकसत्ता, ५ ऑगस्ट २०१३, मुंबई.
२३. लोकसत्ता, ६ ऑगस्ट २०१३, मुंबई


□□□



Dr. Anil Chidrawar
I/C Principal
A.V. Education Society's
Degloor College, Degloor Dist.Nanded